# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३९** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०१** **प्रशासक ठराव क्र.:- २८४** **दिनांक :-१३/०६/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. दि.२७/०५/२०२५ मंगळवार रोजी सकाळी- ११.३० वाजता संपन्न झालेल्या सभा क्र.३८ चे कार्यवृत्त कायम करणे.

**विषय :-** दि.२७/०५/२०२५ मंगळवार रोजी सकाळी- ११.३० वाजता संपन्न झालेल्या सभा क्र.३८ चे कार्यवृत्त कायम करणे.

---

वाचा क्र.१ व २ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

दि.२७/०५/२०२५ मंगळवार रोजी सकाळी- ११.३० वाजता संपन्न झालेल्या सभा क्र.३८ चे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देण्यात येत आहे.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३९** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०२** **प्रशासक ठराव क्र.:- २८५** **दिनांक :-१३/०६/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचेकडिल जा.क्र./बांधकाम/२६०/२०२५ दि.०६/०६/२०२५
३. शहर अभियंता यांचा दि.४/०६/२०२५ चा अभिप्राय
४. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.०३/०६/२०२५ चा अभिप्राय
५. अतिरिक्त आयुक्त यांचा दि.०५/०६/२०२५ चा अभिप्राय
६. आयुक्त यांचा दि.०६/०६/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांचा विकास योजने अंतर्गत विविध शासन निर्णया नुसार मनपास रक्कम रु.२२,८०,००,०००/- मात्रचे अनुदान प्राप्त झालेले आहे. सदरचे अनुदान हे शासन निर्णयानुसार ७५% रक्कम रु.१७,१०,००,०००/- खर्च करणे आवश्यक होते त्यामुळे त्यातील उर्वरीत २५% रक्कम रु.५,७०,००,०००/- मात्र अतिरिक्त प्राप्त झालेली आहे सदर रक्कमे अंतर्गत मनपाचे विविध विकास कामे हाती घेण्यास व प्रस्तावीत केलेल्या प्रभाग क्र.१५ मधील नेताजी चौकातील सार्वजनिक शौचालयाजवळ भराव करुन रस्ता कॉक्रीटीकरण करणे कामांच्या रक्कम रु.२७,३०,२४६/- मात्रच्या अंदाजपत्रकास मान्यता होणेबाबत.

---

वाचा क्र.१ व शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचा वाचा क्रं. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

माजी नगरसेवीका श्रीमती रेखा चुडामण पाटील प्रभाग क्रं.१४ अ यांचे दि.१२/०२/२०२५ चे पत्र प्राप्त झालेले आहे त्यात महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांचा विकास योजने अंतर्गत शासन प्राप्त शिल्लक निधी अंतर्गत ०१ ते १७ कामे करुन मिळण्याबाबत सुचित केलेले आहे. त्यानुसार जळगांव शहर महानगरपालिके करीता सन २०२२-२३ व २०२३-२४ या कालावधीत मुलभुत सोई सुविधांचा विकास योजने अंतर्गत निधी मंजुर करण्यात आलेला आहे. सदरचा निधी हा ७५% शासन हिस्सा व २५% मनपा हिस्सा या प्रमाणात खर्च करण्यास मान्यता प्राप्त झालेल्या आहे.

महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांचा विकास योजने अंतर्गत एकुण रक्कम रु.२२,८०,००,०००/- कोटी मंजुर करण्यात आलेला आहे. सदरचा निधी हा ७५% खर्च होणार असल्याने उर्वरीत २५% रक्कम ही मनपा खजिन्यात रक्कम रु.५,७०,००,०००/- मात्र शिल्लक राहणार आहे. तसेच मंजुर कामांकरीता खर्च होवून कामांमध्ये प्रमाणे बचत झालेली व रद्द झालेल्या कामांची रक्कम रु.१,९१,४२,७६४/- मात्र शिल्लक आहे. त्यामुळे सन्मा.नगरसेवीका श्रीमती रेखा चुडामण पाटील प्रभाग क्रं.१४ अ यांनी ०१ ते २१ कामे निधीच्या २५% शिल्लक रक्कमेतुन करण्याची मागणी केलेली आहे. त्यानुसार सदर कामांचे अंदाजपत्रकांना महासभा/प्रशासक ठराव क्रं.२६३ दि.१२/०३/२०२५ अन्वये मान्यता प्रदान केल्यानुसार सदर ०१ ते २१ कामांचा रक्कम रु.७,०८,९८,३५५/- मात्रचा प्रस्ताव जिल्हाधिकारी,जळगांव यांच्या कडेस दि.२७/०३/२०२५ रोजी सादर करण्यात आलेला आहे. परंतु अतिरीक्त प्राप्त अनुदान रक्कम रु.५,७०,००,०००/- च्या अनुषंगाने रक्कम रु.७,६०,००,०००/- मात्रचा प्रस्ताव सादर करणे अपेक्षीत होते परंतु रक्कम रु.७,०८,९८,३५५/- मात्रचा प्रस्ताव पाठविण्यात आलेला होता त्यात (७,६०,००,००० - ७,०८,९८,३५५) = ५१,०१,६४५/- मात्र शिल्लक राहत असल्याने उर्वरीत रक्कमेचा म्हणजेच रक्कम रु.५१,०१ लक्ष मात्रचा पुरवणी पुस्ताव सादर करता येईल त्यानुसार ०१ ते ०३ कामांचा रक्कम रु.५२,८८ लक्ष मात्रचा पुरवणी प्रस्ताव मुळ प्रस्तावात समावेश करणेबाबत शिवसेना,जळगांव जिल्हा प्रमुख श्री.विष्णू रामदास भंगाळे यांनी त्यांचे दि.२२/०४/२०२५ चे पत्रानुसार सुचति केलेले आहे. त्यानुसार ०१ ते ०३ कामे वर नमुद प्रमाणे शासनाकडुन महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांचा विकास योजने अंतर्गत रक्कम रु.५,७०,००,०००/- मात्रच्या अतिरीक्त अनुदान म्हणुन महानगरपालिका जळगांव यांना प्राप्त झालेला आहे. सदरचे अनुदाना अंतर्गत पुरवणी ०१ ते ०३ कामे

करण्यास महासभा / प्रशासक ठराव क्र.२७५ दि.३०/०४/२०२५ अन्वये रक्कम रु.५२,८८,४७८/- मात्रला मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर कामे हे भुमिअभिन्यासातील व विकास आराखडयातील तरतुदीशी सुसंगत असल्या बाबतचे प्रमाणपत्र सहा.संचालक, नगररचना यांचेकडुन प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे. प्रस्तावावर यांची मान्यता होण्याकरीता प्रस्ताव सादर करण्यास मान्यता मिळावी.

तदपुर्वी सदर निधी अंतर्गत प्रभाग क्र.१५ मधील नेताजी चौकातील सार्वजनिक शौचालया जवळ भराव करुन रस्ता कॉक्रीटीकरण करणे कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु.२७,३०,२४६/- मात्रचे तयार करण्यात आलेले आहे. सदरचे काम हे मुलभुत सोई सुविधांच्या विकास कार्यक्रमा अंतर्गत अतिरिक्त प्राप्त रक्कम रु.५.७० कोटी मात्रच्या निधी अंतर्गत करण्यास व सदर कामाचा पुरवणी प्रस्ताव म्हणुन जिल्हाधिकारी,जळगांव,जि.जळगांव यांचेकडेस पाठविण्यास मान्यता मिळण्यासाठी शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाही तसेच व्दिरुक्ती होणार नाही याची दक्षता घ्यावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३९** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०३** **प्रशासक ठराव क्र.:- २८६** **दिनांक :-१३/०६/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. विदयुत विभाग प्रमुख, विदयुत विभाग यांचेकडिल जा.क्र./मनपा/विदयुत/८२/२०२५-२६ दि.११/०६/२०२५

३. शहर अभियंता यांचा दि.२६/०५/२०२५ चा अभिप्राय

४. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.०३/०६/२०२५ चा अभिप्राय

५. अतिरिक्त आयुक्त यांचा दि.०३/०६/२०२५ चा अभिप्राय

६. आयुक्त यांचा दि.०६/०६/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** विदयुत विभागा अंतर्गत येत असलेल्या युनिट कार्यालया ठिकाणी तांत्रिक कामे करणे करीता १ अभियंता व १० वायरमन हे बाह्यस्त्रोत पुरवठादार/मक्तेदार यांचेकडुन तांत्रिक मनुष्यबळ पुरविणेबाबत.

वाचा क्र.१ व विदयुत विभाग प्रमुख, विदयुत विभाग यांचा वाचा क्रं. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगाव शहर महानगरपालिका क्षेत्रातील विद्युत विभागाकडील अत्यावश्यक सेवा लक्षात घेता विद्युत सेवा हि सार्वजनिक सुविधा असुन नागरिकांना अखंडित व सुरक्षीत विद्युत व्यवस्था करणे करीता तांत्रिक मनुष्यबळ आवश्यक आहे.

विद्युत विभागामार्फत पथदिवे देखभाल दुरुस्तीची कामे, महावितरण कंपनी कडील फॉल्ट काढण्याची कामे, तसेच संपुर्ण शहरात पथदिवे व्यवस्था सुरळीत राहण्यासाठी लोक प्रतिनिधी यांनी सांगितलेली कामे तात्काळ स्वरूपात करण्यात येतात. शहरातील पथदिवे बाबत नागरिकांकडून एकूण अंदाजित ३०० ते ३५० पथदिव्यांच्या तक्रारी दर आठवड्याला विद्युत विभागाला प्राप्त होत असतात. सदर तक्रारींचे वायरमन यांचे द्वारे निरसन विद्युत विभागा मार्फत करण्यात येते. जळगाव शहरात एकूण २४५२१ पथदिवे आहेत व त्यांचे नियंत्रण विद्युत विभागाद्वारे केले जाते. तसेच EESLकंपनीने काम बंद केल्याने EESL मार्फत बसविण्यात आलेले CCMS यंत्रणा देखभाल दुरुस्ती ही विभागामार्फत करण्यात येत असते सध्यस्थितीत मनुष्यबळ कमी असल्याने काही कामे करण्यास विलंब होत असतो त्यामुळे काहीवेळा नागरिकांचा कर्मचारी व अधिकारी यांच्यावर रोष व्यक्त होत असतो. याअनुषंगाने युनिट क्रमांक १ ते ४ या प्रभागांमधील पथ दिव्यांची देखभाल दुरुस्ती, महावितरणचे फॉल्ट काढणे करीता व विद्युत विभागाकडील विविध तातडीचे तांत्रिक कामे करणे करीता कर्मचाऱ्यांची अत्यंत आवश्यकता आहे. तसेच सद्यस्थितीत मान्सून लवकरच सुरू होणार असुन पावसाळ्यात MSEB कडील फॉल्ट चे प्रमाण खुपच जास्त असते. तसेच बंद पथदिवे दुरुस्ती करण्याचे प्रमाणही जास्त असते. तसेच आपत्ती व्यवस्थापन करणे कामी २४ तासाकरिता वायरमन यांचे शिफ्ट निहाय तांत्रिक मनुष्यबळ पुरवावे लागते तरी विद्युत विभागाकडील सद्यस्थितीत मनुष्यबळ अपुर्ण असुन त्याकरीता बाह्ययंत्रणेकडून मनुष्यबळ घेणे आवश्यक आहे.

तसेच १७ मजली प्रशासकीय इमारतीच्या बेसमेंटला विद्युत विभागाची पॅनलरूम आहे. सदर पॅनलरूम मधून प्रशासकीय इमारतीचे विद्युत व्यवस्था पाहणी व दुरुस्तीचे कामे केली जातात. तसेच म.रा.वि.वि.कंपनीचा विजपुरवठा खंडित झाल्यास प्रशासकीय इमारती मधील कामकाज सुरळीत राहणे करिता तात्काळ जनरेटर चालू बंद करणे, मनपा अंतर्गत येणारे फुले मार्केट व गोलाणी मार्केट येथील पथदिवे चालू बंद करण्याची व दुरुस्तीची कामे करणे, सभागृह येथे काही कार्यक्रम असल्यास माईक व्यवस्था व विद्युत व्यवस्था करणे करिता २ कर्मचारी येथे उपलब्ध करून देण्यात येतात. १७ मजली प्रशासकीय इमारती मधील ६ उद्वाहके यांचे नियंत्रण देखील पॅनल रूम मधून केले जाते. वरील प्रमाणे कामे करण्याकरिता पॅनलरूम येथे ४ शिफ्टमध्ये कामे केली जातात. शिफ्टनिहाय कार्यपद्धतीच्या अनुषंगाने प्रत्येकी शिफ्टसाठी किमान ३ वायरमन आवश्यक असुन एकूण ०४ वायरमन यांची नियुक्ती झाल्यास कामकाज सुरळीत पार पाडण्यास मदत होईल.

**विद्युत विभागात कार्यरत कर्मचारी व आवश्यक कर्मचारी यांची माहिती खालील प्रमाणेः-**

| युनिट क्रं | कार्यरत वायरमन | आवश्यक वायरमन |
|---|---|---|
| विद्युत विभाग युनिट क्रं. १ | ३ | १ |
| विद्युत विभाग युनिट क्रं. २ | १ | ३ |
| विद्युत विभाग युनिट क्रं. ३ | ३ | १ |
| विद्युत विभाग युनिट क्रं. ४ | ३ | १ |
| विद्युत विभाग युनिट क्रं. ५ | २ | ४ |
| एकूण | १२ | १० |

| युनिट क्रं | कार्यरत कनिष्ठ अभियंता | आवश्यक कनिष्ठ अभियंता |
|---|---|---|
| विद्युत विभाग युनिट क्रं. १ | १ व अतिरिक्त यु.क्रं.३ | ० |
| विद्युत विभाग युनिट क्रं. २ | ० | ० |
| विद्युत विभाग युनिट क्रं. ३ | ० | ० |
| विद्युत विभाग युनिट क्रं. ४ | १ व अतिरिक्त यु.क्रं.२ | ० |
| विद्युत विभाग युनिट क्रं. ५ | ० | १ |
| एकूण | ०२ | ०१ |

नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक : जमपा- २०२० / प्र.क्र. १८४ / नवि- २५ दि. १६ फेब्रुवारी, २०२३ अन्वये जळगाव शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर नविन पदे निर्माण करण्यास व महानगरपालिकेच्या सुधारीत आकृतीबंधास मान्यता मिळालेली आहे. यामध्ये विद्युत विभागाकरीता ६५ पदसंख्येला मान्यता मिळालेली आहे. यापैकी वायरमन ३३ पदे व कनिष्ठ अभियंता ०४ पदे मान्यता मिळालेली आहे. तरी वरील प्रमाणे वायरमन यांची १९ पदे रिक्त आहेत व कनिष्ठ अभियंता यांची ०२ पदे रिक्त आहेत तरी कनिष्ट अभियंता या एका पदाची आवश्यकता आहे. उपरोक्त विद्युत विभागाची सद्याची कर्मचारी संख्या लक्षात घेता बाह्य यंत्रणा/ ठेकेदारामार्फत ११ महिने करीता १० वायरमन व १ कनिष्ठ अभियंता असे एकूण ११ कुशल कामगार बाह्ययंत्रणेद्वारे घेणे योग्य राहिल.

(A)

उपरोक्त कुशल मनुष्यबळ घेणे कामी कामगार आयुक्त यांचे कार्यालय, कामगार भवन ई-ब्लॉक, सी-२० वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे (पु) मुंबई यांचेकडून दर सहा महिन्यानंतर प्रसिद्ध होणाऱ्या कुशल / अर्धकुशल / अकुशल कामगारांना दिला जाणारा किमान वेतन अधिनियम १९४८ अंतर्गत प्रसिद्ध पुस्तिका मधिल अ.क्र. ६१ स्थानिक स्वराज्य संस्था ( ब) ग्रामपंचायत वगळून) कुशल कामगार परिमंडळ १ नुसार मुळवेतन १४,०००/- + विशेष भत्ता रु. ८,६१०/- प्रतीमहा (२६ दिवस) रु. २२,६१०/- इतका असून एका दिवसांकरीता प्रती कुशल कामगार रु. ८६९.६१/- इतके किमानवेतन येते.

(B)

कामगार आयुक्त, मुंबई यांचे दि.०६/०८/२०२४ च्या परिपत्रकानुसार सध्यास्थितीत किमान वेतन ८६९ रु. प्रति कुशल कामगार प्रति दिवस असून त्यानुसार अभिकर्त्यामार्फत कुशल कामगार पुरवठा करणे कामी सर्विस चार्ज किमान वेतनाच्या १०% गृहित धरल्यास अंदाजित ८७ रु. सर्विस चार्ज अपेक्षित आहे.

(C)

कामगार आयुक्त, मुंबई यांचे दि.०६/०८/२०२४ च्या परीपत्रकानुसार कामगारांना देय असलेले किमान वेतन दर रु.८६९/- असून या व्यतिरिक्त कामगार कायद्यातील तरतुदीनुसार ३४.६१% लेव्हीची रक्कम अभिकर्त्यामार्फत कामगारांना देणे अपेक्षित आहे.

| अ.क्र. | विवरण | कामगार संख्या | टक्केवारी | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | मुळ वेतन | - | - | ५३८ |
| २ | विशेषभत्ता | - | - | ३३१ |
| | एकुण = मुळवेतन + विशेषभत्ता | १ कामगार | | ८६९ |
| | GST 18% (प्रती कुशल कामगार) | | | १५६ |
| | | | एकुण | १०२५ |
| १ | भविष्य निर्वाह निधी | १ कामगार | १२.३६ % | १०७ |
| २ | ई.एस.आय.सी. | १ कामगार | ३.२५ % | २८ |
| ३ | बोनस | १ कामगार | ८.३३ % | ७२ |
| ४ | ग्रॅज्युईटी | १ कामगार | ४.०० % | ३५ |
| ५ | किरकोळ रजा | १ कामगार | १.०० % | ९ |
| ६ | गणवेश / पावसाळी साहित्य वाटप करणे | १ कामगार | ४.०० % | ३५ |
| ७ | Workmen compention Insurance | १ कामगार | १.६७ % | १५ |
| ८ | सेवा शुल्क (सर्व्हिस चार्ज) कामगार पुरवठा करणेबाबत (मुळवेतन व विशेष भत्ताचे १० %) | १ कामगार | | ८७ |
| | | | एकुण | १४१३ |

१० वायरमन व १ कनिष्ठ अभियंता कुशल कामगार A+B+C नुसार पुरवठादाराला अदा करण्यात येणारी रक्कम खालील प्रमाणे आहे.
११ कुशल कामगारांसाठी प्रति दिवस = रु. १५,५४३/-
प्रति महीना (२६ दिवस) = रु. ४,०४,११८/-
११ महीने करीता = रु ४४,४५,२९८/-

| प्रति दिवस | प्रति महीना (२६ दिवस) | ११ महीने करीता |
|---|---|---|
| रु. . १५,५४३/- | रु. ४,०४,११८/- | रु ४४,४५,२९८/- |

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरीता वरील अंदाजपत्रकीय खर्च अपेक्षित असुन पुढील ११ महीने कालावधीत आयुक्त कामगार यांचे परीपत्रका नुसार विशेष भत्यात वेळोवेळी होणारी दरवाढ अपेक्षित आहे. शासन निर्णय क्रमांकः जमपा -२०२४ / प्र. क्र.०१/ नवि-२५ दि. १४ ऑक्टोंबर, २०२४ नुसार जळगाव महानगरपालिका सेवा (सेवाप्रवेश व सेवांचेवर्गीकरण) नियम २०२४ मान्यता मिळालेली आहे. यानुसार विद्युत विभागाला आवश्यक वायरमन यांची शैक्षणीक व तांत्रिक अर्हता खालील प्रमाणे.

| अ.क्र. | आवश्यक असलेले कर्मचारी पदनाम | आवश्यक कर्मचारी संख्या | शैक्षणीक व तांत्रिक अर्हता (सेवा प्रवेश नियमानुसार) |
|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ अभियंता | ०१ | अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची विद्युत शाखेची पदवी किंवा पदविका (Diploma Electrical/B.E. Electrical) उत्तीर्ण .<br>ब) महानगरपालिका विद्युत विभाग येथे कायम कर्मचारी कनिष्ठ अभियंता या पदावर सेवानिवृत्त झाले असल्यास प्रथम प्राधान्य.<br>क) महानगरपालिका विद्युत विभाग कनिष्ठ अभियंता या पदावर तात्पुरत्या स्वरूपात कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य.<br>ड) नियमित उमेदवाराचे यांची वयो मर्यादा ३०पेक्षा जास्त नसावी तसेच महानगरपालिका विद्युत विभाग येथील सेवानिवृत्त कर्मचारी यांची वयो मर्यादा ६५पेक्षा जास्त नसावी. |
| २ | वायरमन (तारतंत्री) /इलेक्ट्रिशियन (वीजतंत्री) | | अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत परीक्षा (S.S.C.) उत्तीर्ण.<br>ब-१)शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे तारतंत्री कोर्स उत्तीर्ण आवश्यक.<br>किंवा<br>ब-२) महाराष्ट्र शासन उद्योग ऊर्जा व कामगार विभागांचे तारतंत्रीचे प्रमाणपत्र/ पदविका या कोर्सचे शिक्षण असणे आवश्यक.<br>क)महानगरपालिका विद्युत विभाग येथे कायम कर्मचारी वायरमन या पदावर सेवानिवृत्त झाले असल्यास प्रथम प्राधान्य.<br>ड) महानगरपालिका विद्युत विभाग तारतंत्री /वीजतंत्री या पदावर तात्पुरत्या स्वरूपात कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य.<br>इ) म.रा.वि.वि.कंपनी कडील काम करण्याचा परवाना किंवा म.रा.वि.वि कडे काम करण्याचा अनुभव असल्यास प्राधान्य.<br>ई) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.<br>उ) नियमित उमेदवार यांची वयोमर्यादा ३०पेक्षा जास्त नसावी तसेच महानगरपालिका विद्युत विभाग येथील सेवानिवृत्त कर्मचारी यांची वयो मर्यादा ६५पेक्षा जास्त नसावी. |

सन २०२५-२६ च्या आर्थिक बजेट मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाकडील कंत्राटी मजुर व वाहने व इतर साहित्य पुरवठा या लेखाशिर्षा अंतर्गत रक्कम रु,२,००,००,०००/- मात्रची तरतुद केलेली आहे. उपरोक्त प्रमाणे शैक्षणिक व तांत्रिक अर्हतेनुसार १० वायरमन व १ कनिष्ठ अभियंता कुशल कामगार बाह्ययंत्रणेद्वारे (एजन्सी / ठेकेदार मार्फत) भरणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कमरु ४४,४५,२९८/-मात्रच्या खर्चास मान्यता मिळणेस तसेच मान्यतेनंतर ई-निविदासूचना शासनाचे वेबसाइटवर प्रसिद्ध करणेस तसेच त्याबाबतचे माहिती पत्रक दैनिक वृत्तपत्रात प्रसिद्ध करणेस व त्याकामी येणाऱ्या जाहिरातीच्या पर्यायी खर्चास मान्यता मिळणेसाठी विदयुत विभाग प्रमुख यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

**उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.**

**विभागाने विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशीर अडचणी येणार नाही याची दक्षता घ्यावी.**

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३९** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०४** **प्रशासक ठराव क्र.:- २८७** **दिनांक :-१३/०६/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. विदयुत विभाग प्रमुख, विदयुत विभाग यांचेकडिल जा.क्र./मनपा/विदयुत/८८/२०२५-२६ दि.१२/०६/२०२५

३. शहर अभियंता यांचा दि.२/०६/२०२५ चा अभिप्राय

४. अतिरिक्त आयुक्त यांचा दि.१०/०६/२०२५ चा अभिप्राय

५. आयुक्त यांचा दि.१०/०६/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत मंजूर कामांना नाहरकत दाखला मिळणेबाबत.

वाचा क्र.१ व विदयुत विभाग प्रमुख, विदयुत विभाग यांचा वाचा क्रं. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

उपअभियंता, विद्युत उपविभाग सा.बां. विभाग जळगांव यांचेकडील पत्र क्रं. जा.क्रं.जविउवि/९७३ दि. २२/०५/२०२५, अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम २०२५-२६ अतंर्गत जळगांव शहरात विविध वार्ड निहाय एल.ई.डी. पथदिवे पोल उभारणी कामी नाहरकत दाखला मिळणे कामी खालील नमुद केलेल्या कामांचे पत्र प्राप्त झालेले आहेत.

| अ.क्रं | कामाचे नाव |
|---|---|
| १ | प्रभाग क्रं. १२ व ०३ मध्ये प्रत्येकी एक ठिकाणी एलईडी पथदिवे बसविणे. |
| २ | जळगांव मनपा हद्दीतील शिरसोली रस्त्यावरील जकात नाक्याजवळ सोलर एलईडी पथदिवे बसविणे. |
| ३ | प्रभाग क्रं. १०,१३,१२ मध्ये ठिकठिकाणी ६ मीटर उंचीचे एलईडी पथदिवे बसविणे. |
| ४ | प्रभाग क्रं. ०९ व १७ मध्ये ठिकठिकाणी ६ मीटर उंचीचे एलईडी पथदिवे बसविणे. |
| ५ | प्रभाग क्रं. ०८,१५ व १६ मध्ये ठिकठिकाणी ६ मीटर उंचीचे एलईडी पथदिवे बसविणे. |
| ६ | प्रभाग क्रं. ०५,०७ व १४ मध्ये ठिकठिकाणी ६ मीटर उंचीचे एलईडी पथदिवे बसविणे. |
| ७ | प्रभाग क्रं. ०१,०२ व ०३ मध्ये ठिकठिकाणी ६ मीटर उंचीचे एलईडी पथदिवे बसविणे. |

वर नमुद असलेल्या कामांकरीता खालील नमुद केलेल्या अटीशर्तीस अधिन राहुन नाहरकत दाखला देता येईल.

**अटी व शर्ती**

१. महानगरपालिकेमार्फत नाहरकत दाखला जरी देण्यात आला तरी प्रत्यक्षात पोल उभारण्या अगोदर महानगरपालिका विद्युत अभियंता व सार्व.बांधकाम विद्युत उपविभागाचे विद्युत अभियंता यांनी प्रस्तावित कामाचे संयुक्त स्थळ निरीक्षण करुन स्थळ निश्चिती करणे आवश्यक राहील.

२. स्थळ निश्चित केलेनुसार निश्चित केलेल्या मनपा जागेवरच ९ मीटर उंचीचा Octagonal पोल उभारणी करणे आवश्यक राहील.

३. हायमास्ट पोल उभारणी करणे व कार्यान्वीत करण्याची जबाबदारी विद्युत उपविभाग सार्व.बांधकाम यांची असेल.

४. हायमास्ट पोल उभारणी करतेवेळी पुर्वी हायमास्ट पोल उभारलेला असल्यास सदर ठिकाणी पोल उभारु नये, कामाची द्विरुक्ती होणार नाही याची दक्षता घ्यावी.

५. मनपा सुचवेल त्याच क्षमतेचे व संख्येने एलईडी पथदिवे बसविणेबाबत निश्चिती करुन जोडणीबाबत मनपाशी समन्वय साधून कार्यवाही करणे आवश्यक आहे.

६. शासन निर्णयातील / प्रशासकीय आदेशातील अटी व शर्तीची अंमलबजावणी करणे बंधन कारक आहे.

७. हायमास्ट पोलवरील LED पथदिव्यांमुळे मिळणारा प्रकाशाचा फायदा हा कोणालाही व्यक्तीगत होणार नाही. याची दक्षता घ्यावी.

८. हायमास्ट पोल हा मनपाच्या वहीवाटीच्या जागेवर उभारणे बंधन कारक राहील.

९. सदर हायमास्ट पोल उभारणी केल्याबाबत नागरिकांनी अथवा लोकप्रतिनिधींनी आक्षेप घेतल्यास व घेतलेला आक्षेप संयुक्तीक असल्यास हायमास्ट उभारणे कामीचे प्रमाणपत्र रद्द करण्यात येईल.

१०. हमी काळात दुरुस्तीचे काम निघाल्यास त्याची दुरुस्ती करणेची जबाबदारी ही आपल्या विभागाची राहील व हमी काळानंतर आपण यंत्रणा मनपाकडेस हस्तांतरीत केल्यानंतर मनपा वेळोवेळी त्याची दुरुस्ती व देखभाल करेल.

११. हायमास्ट पोलचे वेळोवेळी येणारे विज देयक मनपा अदा करेल.

१२. हायमास्ट पोल उभारणीच्या स्थळी आवश्यकतेनुसार शासनाच्या निर्देशानुसार हायमास्ट पोलवर उभारणीच्या स्थळी आवश्यकतेनुसार एलईडी पथदिवे हे नॅशनल कोडनुसार बसविण्यात यावे. जास्त क्षमतेचे तसेच जास्त संख्येने एलईडी पथदिवे बसविल्यास त्यांची देखभाल दुरुस्ती तसेच वीज देयकाची अदायगी करणेची जबाबदारी आपल्या विभागाची असेल.

१३. शासनाच्या निर्देशनानुसार काम केलेले नसल्यास व भविष्यात असे निदर्शनास आल्यास त्या करिता आपला विभाग सर्वस्वी जबाबदार राहिल.

१४. काही ठिकाणी पोल उभारणीचे स्थळ हे पुर्वी उभारणी झालेल्या पोल जवळच असल्याने अश्या ठिकाणी नवीन पोल उभारणीबाबतचा निर्णय जागेची संयुक्तीकपणे पाहणी करुनच करण्यात यावा.

१५. ज्या ठिकाणी हॅड्रोलीक लॅडर वाहन जाणार नाही अश्या ठिकाणी, अरुंद गल्लीबोळ,चौक नसलेले ठिकाण तसेच स्ट्रिट लाईट करीताचा वीज पुरवठा नसलेले ठिकाणी हायमास्ट पोलची उभारणी करु नये.

१६. हायमास्ट पोल उभारणी करतेवेळी आर्थिंग व इतर विद्युत साहित्य हे तांत्रिक दृष्टया (Technical Specification) नुसार वापरात घेण्यात यावे व भविष्यात अपघात होणार नाही याची काळजी घ्यावी.

१७. हायमास्ट पोल उभारणी केलेनंतर पोलवर काम पुर्ण केले बाबतची दिनांक टाकणे आवश्यक राहील. जेणे करुन ५ वर्षाचा हमी कालावधी बाबत माहिती उपलब्ध होईल.

१८. काम पुर्ण केल्यानंतर १० वर्षा पर्यंतच्या हमी कालावधीत संपुर्ण यंत्रणेची व एलईडीची देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी ही आपल्या विभागाची असेल.

१९. पोल उभारणीचे काम पुर्ण झाल्यानंतर त्याबाबतची माहिती प्रथमत: मनपास द्यावी मनपाने दिलेल्या अटीशर्तीनुसार काम झाल्याबाबतची पाहणी संयुक्तपणे करण्यात आल्यानंतरच एलईडी पथदिव्यांचा विज पुरवठा जोडण्यात यावा.

२०. हमी कालावधीनंतर संपुर्ण यंत्रणा सुस्थितीत मनपाकडेस हस्तांतरीत करावी लागेल.

२१. काम पुर्ण झाल्यावर महानगरपालिकेस कळविण्यात यावे.

२२. वर नमुद कामांची द्विरुक्ती होणार नाही याची दक्षता घ्यावी. प्रस्तावित कामांना यापुर्वी नाहरकत प्रमाणपत्र दिलेले असल्यास ते नाहरकत प्रमाणपत्र रद्द समजण्यात यावे.

२३. अटीशर्तीनुसार काम केलेले नसल्यास कुठल्याही प्रकारचा हस्तांतरण दाखला देणेची जबाबदारी मनपाची राहणार नाही.

२४. नाहरकत प्रमाणपत्रातील अटीशर्तीनुसार काम झालेले असल्यास व ते मनपाने प्रमाणीत केल्यानंतर कामाचे देयक तयार करण्यात यावे. याप्रमाणे कार्यवाही करण्यात न आल्यास भविष्यात होणा-या परिणामास मनपा जबाबदार राहणार नाही.

सदरहु कामे करण्यास कार्यान्वयन यंत्रणा उपअभियंता,विद्युत उपविभाग सा.बां. विभाग जळगांव यांचेकडे असल्याने प्रस्तुत कामे उपअभियंता, विद्युत उपविभाग, सा.बां. विभाग जळगांव यांचेमार्फत करण्यात येणार असल्याने उक्त १ ते ७ कामांना मनपा सर्व साधारण सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. तसेच सदरची कामे उपअभियंता, विद्युत उपविभाग सा.बां. विभाग जळगांव यांचेकडुन करण्यात येत असल्याने नाहरकत दाखला देणेस मान्यता मिळण्यासाठी विदयुत विभाग प्रमुख, विदयुत विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाही याची दक्षता घ्यावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१
फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

## MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३९** **(महासभा)**

---

**विषय क्र.:- ०५** **प्रशासक ठराव क्र.:- २८८** **दिनांक :-१३/०६/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. भांडारपाल, भांडार विभाग यांचेकडिल जा.क्र./भांडार/४८/२०२५-२६ दि.१२/०६/२०२५
३. भांडारपाल यांचा दि.११/०६/२०२५ चा अभिप्राय
४. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.१२/०६/२०२५ चा अभिप्राय
५. उपायुक्त यांचा दि.१२/०६/२०२५ चा अभिप्राय
६. आयुक्त यांचा दि.१२/०६/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** मंडप, खुर्ची - टेबल व इतर साहित्य भाडेतत्वावर पुरवठा करणे बाबत ई-निविदा प्रसिध्द करणे कामी महासभेची मान्यता मिळणेबाबत.

---

वाचा क्र.१ व भांडारपाल, भांडार विभाग यांचा वाचा क्रं. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव मार्फत विविध विभागामार्फत विविध कार्यक्रमाचे आयोजन करणेत येतात. तसेच २६ जानेवारी, ०१ मे , १५ ऑगस्ट व इतर कार्यक्रमाचे वेळी प्रशासकीय इमारतीत लाईटींग करणेत येते तसेच मंडप, खुर्च्या व इतर साहित्याची गरजे नुसार भाडे तत्वावर पुरवठा करणे आवश्यक आहे. करीता खालील प्रमाणे

| अ.क्रं. | साहित्याचे नाव | अ.क्रं. | साहित्याचे नाव |
|---|---|---|---|
| १ | फायबर खुर्ची | २३ | जाळी बॅरेकेटींग ५फु. ऊंच |
| २ | सोफा ०३ सीटर | २४ | पत्र्याचे कम्पाऊन्ड ६ फु. ऊंच |
| ३ | सोफा ०२ सीटर | २५ | पत्र्याचे कम्पाऊन्ड १० फु. ऊंच |
| ४ | टेबल १.५x६ | २६ | मेट्रोलीक लाईट |
| ५ | गोल टेबल | २७ | पावर प्लग |
| ६ | पाण्याची टाकी | २८ | सिलींग पंखे |
| ७ | कचऱ्यासाठी डस्टबीन | २९ | सिंलींग पंखे डोम मध्ये |
| ८ | सफेद चादर | ३० | ट्युबलाईट |
| ९ | VIP खुर्ची | ३१ | ऐलएडी पावर |
| १० | टि पॉय | ३२ | कुलर झम्बो |
| ११ | पाईप मंडप | ३३ | गेट १८x३६ |
| १२ | चटाई फ्लॉरींग | ३४ | गेट १८x२४ |
| १३ | सीन्थेटीक फ्लोरींग | ३५ | गेट १२x२४ |
| १४ | नेट ग्रीन फ्लोरींग | ३६ | हापवे गेट १८x६० |
| १५ | स्टेज १ फुट ऊंचीचा | ३७ | वॉटर प्रुफ टेन्ट |
| १६ | स्टेज २ फुट ऊंचीचा | ३८ | डोम |
| १७ | स्टेज ३ फुट ऊंचीचा | ३९ | गादी |
| १८ | स्टेज ४ फुट ऊंचीचा | ४० | उशी |
| १९ | स्टेज ५ फुट ऊंचीचा | ४१ | जनरेटर ६२.५ KVA (डिझल बिना) |
| २० | परदा व्हाईट | ४२ | जनरेटर १२५ KVA (डिझल बिना) |
| २१ | बॅरेकेटींग बाबुची | ४३ | जनरेटर ४.५ KVA (डिझल बिना) |
| २२ | बॅरेकेटींग पाईपची | ४४ | जनरेटर ४० KVA (डिझल बिना) |
| | | ४५ | लाईटींग |

उपरोक्त साहित्य भाडे तत्वावर पुरवठा करणेकामी ई-निविदा mahatenders.gov.in वर प्रसिध्द करणेस व एका वर्षासाठी येणाऱ्या अंदाजीत खर्च रक्कम रु.५०.०० लक्ष मात्रला सा.प्र.सादील या लेखाशिर्षा खाली करणेस मान्यता मिळण्यासाठी भांडारपाल, भांडार विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाही याची दक्षता घ्यावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३९** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०६** **प्रशासक ठराव क्र.:- २८९** **दिनांक :-१३/०६/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचेकडिल जा.क्र./पर्यावरण विभाग/७८/२०२५-२६ दि.१२/०६/२०२५
३. शाखा अभियंता, पर्यावरण विभाग यांचा दि.१०/०६/२०२५ चा अभिप्राय
४. शहर अभियंता यांचा दि.१०/०६/२०२५ चा अभिप्राय
५. सहाय्यक आयुक्त यांचा दि.११/०६/२०२५ चा अभिप्राय
६. नगररचनाकार यांचा दि.११/०६/२०२५ चा अभिप्राय
७. अतिरिक्त आयुक्त यांचा दि.११/०६/२०२५ चा अभिप्राय
८. आयुक्त यांचा दि.११/०६/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** जळगांव शहरातील चौक/दुभाजक खाजगी संस्थांकडून सुशोभित करणेबाबत.

वाचा क्र.१ व शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचा वाचा क्रं. २ ते ८ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

आयुक्त तथा प्रशासक सो यांच्या अध्यक्षतेखाली दि.२८/०५/२०२५ रोजी चौक/डिव्हायडर (दुभाजक ) सुशोभिकरण करण्या संदर्भात बैठक आयोजित करण्यात येऊन सदर बैठकीत जळगाव शहर महानगर पालिका क्षेत्रात असलेले चौक/डिव्हायडर (दुभाजक ) विकासकांना मंजुरी देण्यात आलेल्या विकासक यांच्या तर्फे आलेल्या प्रस्तावाचे सादरीकरण झालेले होते व प्रस्ताव वर चर्चा करण्यात येऊन काही डिव्हायडरची (दुभाजक ) मागणी एकापेक्षा जास्त विकासक यांच्या कडुन करण्यात आली होती सर्व उपस्थिता सोबत चर्चा करण्यात येऊन सदर विकासकांनी आपले प्रस्ताव वास्तुविषारद यांच्या कडे सादर करणे बाबत सुचित करण्यात आले होते त्याअनुषंगाने देण्यात आलेल्या १४ विकासका पैकी जे आलेले प्रस्ताव वास्तुविषारद यांच्या कडुन मनपा पर्यावरण विभागाकडे जमा करण्यात आलेले आहे. त्यास दि. २८/०५/२०२५ च्या बैठकीत मान्यता देण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | विकासकांचे नाव | दिलेले चौक व दुभाजक |
|---|---|---|
| १ | आर.सी.बाफ़ना | शिवाजी नगर उड्डाणपुल ते शास्त्री टावर ते जैन मंदीर |
| २ | डायनामिक्स मल्टीप्रो,जळगांव | १) जैन मंदीर ते चित्रा चौक ते खंडवा पिस (TVS शोरुम) |
| ३ | आर.एल.ज्वेलर्स | खंडवा पिस (TVS शोरुम) ते अजिंठा चौफ़ुली |
| ४ | सरस्वती फोर्ड | टावर चौक ते शितल कलेक्शन |
| ५ | ओरिएन्ट सिमेंट | १) शितल कलेक्शन ते नेहरु चौक २) नेहरु चौक ते Axis बँक ३)नेहरु चौक ते रेल्वे स्टेशन |
| ६ | जी.एम.फाउंडेशन | Axis बँक ते नंदीनीबाई बेंडाळे शाळा |
| ७ | भंगाळे गोल्ड | नंदीनीबाई बेंडाळे शाळा ते स्वातंत्र चौक |
| ८ | जैन इरिगेशन | १) स्वातंत्र चौक ते लाली पान सेंटर २)जैन मंदीर ते काव्यरत्नावली चौक३)काव्यरत्नावली ते महाबळ स्टॉप ४) डि-मार्ट ते रामानंद नगर ५) डि-मार्ट ते लांडोरखोरी उद्यान ६) स्वामी समर्थ चौक ते एकनाथ नगर,(रामेश्वर कॉलनी) |
| ९ | हॉटेल रॉयल पॅलेस | लाली पान सेंटर ते जैन मंदीर चौक (मनपा रस्ता) |
| १० | आदित्य फार्म | सिंधी कॉलनी चौक ते पिंप्राळा उड्डाणपुल |
| ११ | अमर डेअरी | रिमांड होम कॉर्नर |
| १२ | सुरज फुड इंडस्ट्रीज | महाबळ स्टॉप ते गाडगेबाबा चौक (**माघार प्रस्ताव**) |

यापैकी सुरज फुड इंडस्ट्रिज यांना देण्यात आलेले आहे. डिव्हायडर (दुभाजक ) यांनी आपल्या काही पारिवारीक अडचणी मुळे चौक/डिव्हायडर (दुभाजक )सुशोभिकरण उपक्रमातुन माघार घेण्याबाबत पत्र दिलेले आहे.त्यांना वगळून इतर अ.क्र. १ ते ११ यांचे वरील प्रस्ताव विकासक यांना खालील अटी-शर्तींनुसार ५ वर्षासाठी देणेस मान्यता मिळण्यासाठी शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

जळगांव शहरातील चौक व रसते दुभाजक खाजगी संस्था/उदयोजक/सेवाभावी संस्था यांच्या मार्फत विकसीत करुन सुशोभिकरण करणे बाबत अटी व शर्ती खालील प्रमाणे

१. दुभाजक अथवा चौक विकसीत व सुशोभिकरण करण्यापुर्वी सुशोभिकरणाचे डिझाईन प्रथमत: संबंधीत विभागाकडुन मान्य करुन घेतल्यानंतर कामास सुरुवात करता येईल.
२. चौक/डिव्हायडर हे विकसीत केल्यानंतर व सुशोभिकरणानंतरही सदर जागेची मालकी महानगरपालिकेचीच राहिल.
३. सदर दुभाजक विकसीत व सुशोभिकरण केल्यानंतर या दुभाजकाचा वापर फक्त संबंधित प्रतिष्ठानाच्या व त्यांच्या उत्पादनाच्या जाहिराती करीता करता येईल या व्यतिरिक्त अन्य कोणतीही संस्था/प्रतिष्ठाण अथवा त्यांच्या उत्पादनाच्या जाहिराती करीता वापर करता येणार नाही तसेच या दुभाजकाचा उपयोग कोणत्याही प्रकारे आर्थिक लाभ होण्याकरीता करता येणार नाही.
४. रस्ता दुभाजकावर/चौकात संस्थेची जाहिरात करण्याचा अधिकार चौक/दुभाजक विकसित करणाऱ्या विकासकाचाच राहिल व त्यासाठी मनपा मार्फत शुल्क आकारणी करण्यात येणार नाही. करारनामा कालावधीपर्यंत चौकाचे जागेत दुभाजकावर जाहिरात करण्याचा अधिकार चौक/डिव्हायडर विकासकाचाच राहिल.
५. दुभाजकात लावण्यात येणाऱ्या जाहिरातीमुळे त्यांचे फलक, बोर्ड होर्डींग यांच्यामुळे रहदारीस कोणतीही अडचण होणार नाही किंवा वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन होणार नाही या प्रमाणे जाहिराती जावणे बंधनकारक राहिल.
६. सदर दुभाजकात करावयाच्या जाहिरातीच्या प्रमाणात आपल्या प्रतिष्ठानच्या अथवा उत्पादनाच्या जाहिरातीचे प्रमाणे ६० टक्के व महानगरपालिके करीता सार्वजनिक जाहिरातीचे प्रमाण ४० टक्के राहिल. महानगरपालिकेतर्फे करावयाच्या जाहिरातीची व्यवस्था विकासक यांना करावी लागेल.
७. सदर करारनाम्याची मुदत ही करारनामा करुन दिल्यापासुन ०५ वर्षापर्यंत राहिल व त्या नंतर मनपा मार्फत धोरण निश्चिती नुसार निर्णय घेण्याचा संपुर्ण अधिकार हा महानगरपालिकेचा राहिल व तो विकासकास देखिल बंधनकारक राहिल.
८. सदर रस्ता दुभाजक टाकणे सुशोभिकरण करणे व चौक विकसीत करणेस येणारा संपुर्ण खर्च संस्था/ विकासकास करावयाचा आहे व त्या बाबत मनपाकडे कोणताही मोबदला मागता येणार नाही.
९. महानगरपालिकेस आावश्यक भासल्यास धोरणात्मक बदल करण्याचा संपुर्ण अधिकार राहिल व त्या बाबत विकासकास कोणताही न्यायालयीन वाद उपस्थित करता येणार नाही.
१०. सदर रस्ता दुभाजक सुशोभिकरण/चौकाची देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी विकासकाची राहिल.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ८ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३९** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०७** **प्रशासक ठराव क्र.:- २९०** **दिनांक :-१३/०६/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. परिवहन विभाग प्रमुख, परिवहन विभाग यांचेकडिल जा.क्र./परिवहन/०३/२०२५ दि.१२/०६/२०२५
३. परिवहन विभाग प्रमुख यांचा दि.११/०६/२०२५ चा अभिप्राय
४. शहर अभियंता यांचा दि.११/०६/२०२५ चा अभिप्राय
५. सहाय्यक आयुक्त यांचा दि.११/०६/२०२५ चा अभिप्राय
६. उपायुक्त यांचा दि.१२/०६/२०२५ चा अभिप्राय
७. आयुक्त यांचा दि.१२/०६/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** केंद्र शासन पुरस्कृत पीएम ई-बस सेवा योजनेंतर्गत सुरु होत असलेल्या परिवहन उपक्रमाकरीता कंत्राटी पध्दतीने वाहक पदाकरीता पदभरती करणेबाबत.

---

वाचा क्र.१ व परिवहन विभाग प्रमुख, परिवहन विभाग यांचा वाचा क्रं. २ ते ७ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

देशातील परिवहन सेवेमध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने व हवेतील प्रदुषण कमी करण्याच्या दृष्टीने शाश्वत उपाय योजनेच्या अनुषंगाने केंद्र शासनाने दिनांक १६/०८/२०२३ रोजी पीएम ई-बस सेवा योजना मंजूर केली आहे. तसेच महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक पीबसे-२०२४/प्र.क्र.४०/नवि-३२ दि.०७ मार्च २०२४ नुसार राज्यातील २३ महानगरपालिकांमध्ये केंद्र शासन पुरस्कृत पीएम ई-बस सेवा योजनेच्या अंमलबजावणीस मान्यता मिळालेली असुन सदर योजनेमध्ये जळगांव शहर महानगरपालिकेच्या देखील समावेश असुन लवकरच या योजनेव्दारे जळगांव शहरात परिवहन सेवा सुरु होणार आहे. सदर परिवहन उपक्रम राबविण्यासंबंधी महानगरपालिकेमार्फत दि.२७/०९/२०२३ रोजी शासनास आवश्यक हमीपत्र सादर करण्यात आलेले आहे.

सदर परिवहन योजनेमध्ये केंद्र शासन नियुक्त पुरवठादारामार्फत बसेसचा पुरवठा व देखभालदुरुस्ती इ.बाबींचा समावेश असुन प्रवासी भाडे व अन्य महसुली उत्पन्न जमा करण्याचे काम अंमलबजावणी संस्थेस करावे लागणार आहे. कैंद्रीय सुचनांच्या अनुषंगाने महानगरपालिकेमार्फत एकूण ५० ई-बसेस बाबत सविस्तर प्रकल्प अहवाल शासनास दिनांक २७/०९/२०२४ रोजी सादर करण्यात आलेला असुन सदर अहवालास शासनाने मान्यता दिलेली आहे.

तरी प्रवासी भाडे मार्फत मिळणारे उत्पन्न जमा करणेकरीता ई-बसेस मध्ये वाहकांची नियुक्ती करावी लागणार असुन दिनांक १६/०२/२०२३ रोजीच्या महानगरपालिकेच्या सुधारीत आकृतीबंधात परिवहन विभाग नसल्यामुळे वाहक हे पद देखील मंजुर नाहीत. तरी एकूण ५० बसेच्या मार्गक्रमणाकरीता अदमासे १२० वाहकांची आवश्यकता असणार आहे. सदर वाहक कंत्राटी पध्दतीने भरती करणे आवश्यक आहे. म्हणून पीएम ई-बस सेवा योजने अंतर्गत प्रवासी भाडे मार्फत मिळणारे उत्पन्न जमा करणेकरीता एकूण १२० वाहकांची कंत्राटी पध्दतीने विहीत नियमावलीनुसार भरती प्रक्रिया करणेस मान्यता मिळण्यासाठी परिवहन विभाग प्रमुख, परिवहन विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ७ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाही याची दक्षता घ्यावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र.३९** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०८** **प्रशासक ठराव क्र.:- २९१** **दिनांक :-१३/०६/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचेकडिल जा.क्र./बांधकाम/२९०/२०२५ दि.१२/०६/२०२५
३. शहर अभियंता यांचा दि.११/०६/२०२५ चा अभिप्राय
४. अतिरिक्त आयुक्त यांचा दि.१२/०६/२०२५ चा अभिप्राय
५. आयुक्त यांचा दि.१२/०६/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** प्रभाग समिती क्र.०४ करीता गिरणा टाकी परिसरामध्ये प्रशासकीय इमारत बांधकाम करणे.

वाचा क्र.१ व शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचा वाचा क्रं. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहर महानगरपालिका हद्दीमध्ये प्रशासकीय कामाच्या सुसोयींकरीता एकूण ०४ प्रभाग करण्यात आलेले असून त्यापैकी प्रभाग क्र.४ चे प्रशासकीय कार्यालय सदयस्थितीत गिरणा टाकी परिसरामध्ये सन १९८० सालाचे बांधकाम असलेल्या रहिवाशी निवासस्थान येथे तात्पुरते स्वरुपात सुरु आहेत. सदर बांधकामे जीर्णावस्तेत असुन वारंवार देखभाल दुरुस्ती करावी लागत आहेत. तसेच मुळ बांधकामे रहिवाशी निवासस्थाने या उद्देशाने बांधण्यात आलेली असल्यामुळे आवश्यक कार्यालयीन बाबींचा अभाव या बांधकाम रचनेत दिसुन येत असुन नागरिकांना देखील प्रशासकीय सेवा पुरवितांना अडथळा ठरीत आहेत. सदर जीर्णावस्तेमधील बांधकामे तोडून नवीन अदयावत प्रशासकीय इमारत बांधणे आवश्यक आहे. आयुक्त यांच्या क्षेत्रभेटी दरम्यान आयुक्त यांनी प्रभाग कार्यालयामार्फत नागरिकांना पुरविण्यात येत असलेल्या सर्व सुविधा एकाच छताखाली मध्यवर्ती केंद्राव्दारे पुरविण्याबाबत आराखडे तयार करुन नवीन प्रशासकीय इमारत बांधणेबाबत सुचीत केलले आहे.

महानगरपालिका मालकीच्या गिरणा टाकी परिसरामध्ये पश्चिम बाजूस नवीन प्रभाग समिती कार्यालयाच्या प्रशासकीय इमारत बांधकामाकरीता मुबलक जागा उपलब्ध असुन नवीन प्रशासकीय इमारतीच्या बांधकामास अदमासे रु.५.५० कोटी मात्र खर्च अपेक्षीत आहे. तरी उपरोक्त स्थळी प्रभाग समिती क्र.०४ करीता मुख्य प्रशासकीय इमारत बांधणेकामी मान्यता मिळण्यासाठी शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाही याची दक्षता घ्यावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३९** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०९** **प्रशासक ठराव क्र.:- २९२** **दिनांक :-१३/०६/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. प्रशासन अधिकारी, मनपा शिक्षण मंडळ,जळगांव यांचेकडिल जा.क्र./मनपाशिमं/२०२५-२६/९६ दि.१२/०६/२०२५
३. प्रशासन अधिकारी,मनपा शिक्षण मंडळ यांचा दि.०४/०६/२०२५ चा अभिप्राय
४. आस्थापना अधिक्षक यांचा दि.१२/०६/२०२५ चा अभिप्राय
५. उपायुक्त (सा.प्र.) यांचा दि.१२/०६/२०२५ चा अभिप्राय
६. आयुक्त यांचा दि.१२/०६/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** ऑल इंडिया मेमन जमात फेडरेशन जशमनपा उर्दू प्राथमिक शाळा क्र.११ या शाळेत इ.१ ली ते ८ वी पर्यंत वर्ग असून माध्यमिक शिक्षणाची सोयीसाठी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून या शाळेत इ.९ वी व १० वी चा वर्ग सुरु करण्यास मान्यता देण्याबाबत.

वाचा क्र.१ व प्रशासन अधिकारी, मनपा शिक्षण मंडळ,जळगांव यांचा वाचा क्रं. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

ऑल इंडिया मेमन जमात फेडरेशन जशमनपा उर्दू प्राथमिक शाळा क्र.११ सुप्रिम कॉलनी,जळगांव या शाळेचे शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सचिव यांनी दि.११/०४/२०२५ रोजीच्या दिलेल्या निवेदनानुसार सदर शाळेत इ.१ली ते ८ वी पर्यंत वर्ग सुरु असून एकूण ७१९ विदयार्थी शिक्षण घेत आहे. शाळेत शिक्षण घेणारे बरेच विदयार्थी गोर-गरीब पालकांचे आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये इ.८ वी मध्ये एकूण ७२ विदयार्थी शिक्षण घेत असून जवळच्या ३ कि.मी.पेक्षा जास्त अंतरावर त्यांना माध्यमिक शिक्षण पूर्ण करण्यासाठी उर्दू माध्यमाची कोणतीही माध्यमिक शाळा उपलब्ध नाही. या कारणाने मुली आठवी उत्तीर्ण झाल्यावर पुढील शिक्षण घेत नाही. त्यामुळे विदयार्थी गळतीचे प्रमाण वाढलेले आहे. तसेच आर्थिक कारणाने काही विदयार्थी दुरच्या शहरी भागात रिक्षा किंवा अन्य वाहनाने ये-जा करुन शिक्षण घेऊ शकत नाही.

वरील सर्व बाबींचा विचार करुन पालकांच्या मागणीनुसार व विदयार्थ्यांच्या भविष्याचा विचार करता ऑल इंडिया मेमन जमात फेडरेशन जळगांव तर्फे इ.९ वी व १० वी चे वर्ग बसविण्यासाठी दोन सुसज्ज वर्ग खोल्या तयार करुन देण्यात आलेल्या आहे. तसेच जो पर्यंत इ.९ वी व १० वी साठी आवश्यक माध्यमिक शिक्षक उपलब्ध होत नाही तो पर्यंत ऑल इंडिया मेमन जमात फेडरेशन जळगांव स्वखर्चाने येथे माध्यमिक ९ वी व १० वी चे शिक्षक उपलब्ध करुन देण्यास तयार आहे असे त्यांच्या अर्जात नमूद करण्यात आले आहे.

तसेच शासन निर्णय क्रमांक: प्राशव-२०२३/प्र.क्र.९७/एस एम-५ शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय मुंबई दि.१५ मार्च २०२४ चा संदर्भ देऊन राष्ट्रिय शैक्षणिक धोरण २०२० नुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांचे सक्षमीकरण व दर्जावाढ अनुसार इ.१ ली ते ७ वी च्या शाळांना इ.८ वी वर्ग व आवश्यक असल्यास माध्यमिकचे वर्ग जोडण्यास मान्यता प्रदान करण्यास सक्षम प्राधिकारी म्हणून अनुक्रमे संबंधीत जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद / आयुक्त, महानगरपालिका यांना घोषित करण्यात आले आहे. म्हणून सदर शासन निर्णयानुसार आठवी पर्यंतच्या शाळेत इ.९ वी व १० वी च्या वर्गास मान्यता देण्याचे अधिकार शासनाने आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव यांना दिलेले असल्याने ऑल इंडिया मेमन जमात फेडरेशन, ज.श.म.न.पा.उर्दू प्राथमिक शाळा क्र.११ सुप्रिम कॉलनी, जळगांव येथे उर्दू माध्यमाचे इ.९ वी व १० वी चे वर्ग शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून सुरु करण्यास परवानगी देण्यात यावी अशी विनंती करण्यात आली आहे.

सदर विषयाच्या अनुषंगाने मा.श्री.सुरेश दामु भोळे, आमदार, जळगांव शहर यांनी दि.३१/१२/२०२४ च्या पत्रान्वये या शाळेत इ.९ वी ते १० वी चे माध्यमिक वर्ग सुरु करणेबाबत शिफारस दिलेली आहे.

त्या अनुषंगाने महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्र.नपाशा २००९/(४९७/०९)/प्राशि-१ दि.११ जून २००९ च्या शासन निर्णयान्वये स्थानिक स्वराज्य संस्था व पोलीस वेल्फेअर व आर्मी वेलफेअर यांना स्वत:च्या उत्पनातून शासनावर कोणतेही आर्थिक दायित्व न लादता नव्याने माध्यमिक शाळा सुरु करण्यास शासनाची मंजूरी घेण्याची आवश्यकता नसल्याने दि.११/०६/२००९ च्या शासन निर्णयान्वये घोषित केलेले आहे. त्यानुसार महासभा ठराव क्र.२६८ दि.१९/०६/२००९ अन्वये सन २००९-१० या शैक्षणिक वर्षापासून महानगरपालिकेव्दारे शहरात तीन ठिकाणी नवीन उर्दू माध्यमिक विदयालये सुरु करण्याचा तत्वत: निर्णय प्रशासनाने घेवून त्यापैकी महानगरपालिका मार्फत उर्दू हायस्कुल नं.१, अक्सा नगर मेहरुण व उर्दू हायस्कुल नं.२ भवानी पेठ,जळगांव या दोन माध्यमिक शाळा शैक्षणिक वर्ष २००९-१० पासून सुरु करण्यात आलेल्या आहेत. तथापि, शिवाजी नगर परिसरातील मनपा शाळा क्र.१५ च्या इमारतीमध्ये अलफैज फाऊंडेशन या संस्थेव्दारा सुरु असलेल्या अनाधिकृत उर्दू माध्यमिक शाळेस शासनाची मान्यता मिळण्याची शक्यता विचारात घेता शिवाजी नगर परिसरातील प्रस्तावीत मनपा उर्दू माध्यमिक शाळेचा प्रस्ताव तुर्त प्रलंबीत ठेवण्यात आलेला आहे. शासनाने सदर संस्थेस परवानगी नाकारुन शिक्षण विभागामार्फत सदर अनाधिकृत शाळा बंद करण्याची कार्यवाही करण्यात आल्यास त्यातील विदयार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य विचारात घेता मनपा प्राथमिक शाळा.१३ या मध्यवर्ती ठिकाणी मनपाची प्रस्तावीत उर्दू माध्यमिक शाळा क्र.३ सुरु करण्याची तजवीज ठेवणेबाबत निर्णय घेणेत आलेला होता. परंतू, अलफैज फाऊंडेशन,जळगांव या संस्थेस शासनाची मान्यता प्राप्त झाल्याने सदर मनपा उर्दू माध्यमिक शाळा क्र.३ सुरु करण्यात आलेली नाही.

त्यानुसार नवीन मनपा उर्दू हायस्कुल (इ.९ वी ते १० वी) ही सुप्रिम कॉलनी येथील मनपा प्राथमिक शाळा क्र.११ च्या परिसरात ऑल इंडीया मेमन जमात फाऊंडेशन यांनी बांधून दिलेल्या दोन वर्ग खोल्यांमध्ये सुरु करणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता मिळणेसाठी प्रशासन अधिकारी, मनपा शिक्षण मंडळ,जळगांव यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

सदर कामी आवश्यक मनुष्यबळ उपलब्धतेकामी निधीची सदयास्थितीत तरतूद नाही. परंतू, संबंधीत संस्थेने सदर कामी आर्थिक व भौतिक सुविधा पुरवीणेकामी ग्वाही देवून मनपास पत्र दिलेले आहे. माध्यमिक शाळा सुरु करणेकरिता पुरेशी संख्या इ.८वी ७२ पटसंख्या जवळपास शाळा नसल्याने शाळा बाहय होण्याची शक्यता नाकारता येत नाही. वर्ग वाढविण्यास शासनाकडून / मनपाकडुन आर्थिक मदत मिळणार नाही. मनपा निधीतून खर्चाची तरतूद करावी लागेल. इ.९वी व १० वी चा वर्ग सुरु करणेबाबतचा प्रस्ताव महासभेच्या मान्यतेस्तव सादर.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच ऑल इंडीया मेमन जमात फाऊंडेशन यांनी सदर कामी आर्थिक व भौतिक सुविधा पुरवीण्याबाबत पत्राव्दारे मनपास ग्वाही दिलेली आहे त्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप व कायदेशीर अडचण येणार नाही याची दक्षता घ्यावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३९** **(महासभा)**

**विषय क्र.:- १०** **प्रशासक ठराव क्र.:- २९३** **दिनांक :-१३/०६/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. शहर अभियंता,सार्व.बांधकाम विभाग यांचेकडिल जा.क्र./बांधकाम/२८६/२०२५ दि.१२/०६/२०२५
३. शहर अभियंता यांचा दि.११/०६/२०२५ चा अभिप्राय
४. अतिरिक्त आयुक्त यांचा दि.१२/०६/२०२५ चा अभिप्राय
५. आयुक्त यांचा दि.१२/०६/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांचा विकासासाठी विशेष तरतुद (लेखा शिर्ष-४२१७०५४१) योजने अंतर्गत सन २०२४-२५ या आर्थीक वर्षाकरीता यादीनुसार कामे निश्चिती करणे बाबत.

---

वाचा क्र.१ व शहर अभियंता,सार्व.बांधकाम विभाग यांचा वाचा क्रं. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांचा विकासासाठी विशेष तरतुद (लेखा शिर्ष-४२१७०५४१) योजने अंतर्गत सन २०२४-२५ या आर्थीक वर्षातील तरतुदींतुन रक्कम रु.१.०३५१ कोटी मात्रचा निधी जळगांव शहर महानगरपालिकेस शासन निर्णय क्रं.मनपा-२०२५/प्र.क्रं.-१(भाग-९) नवि-१६(ई-९२००४९) दि.२७ फेब्रवारी २०२५ मंजुर करण्यात आलेला आहे. सदरचा निधी हा जिल्हाधिकारी,जळगांव यांना वितरीत करण्याबाबत सुचित केलले आहे. सदर निधीकरीता जिल्हाधिकारी,जळगांव यांना नियंत्रक अधिकारी तसेच जिल्हा प्रशासन अधिकारी,जळगांव यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणुन उक्त शासन निर्णया नुसार घोषित करण्यात आलेले आहे.

सदर मंजुर निधी अंतर्गत खालील नमुद कामे करणे आवश्यक आहे. तरी सदर कामांपैकी अतिदक्षतेचे निकडीचे काम लक्षात घेता सदर कामांची महासभेने प्रथम प्राधान्याने कामाची निवड करुन कामे करण्यास मनपा महासभा/प्रशासक यांची मान्यता होण्यास सादर.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजे रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्रं.०२ अंतर्गत शिवाजी नगर पासुन ते एस.टी.पी.प्लॉट कडे जाणारा (डि पी रोड) कॉक्रिटीकरण करणे | १,०३,५०,०००/- |
| २ | प्रभाग क्रं.०९ मधील पिंप्राळा गट नं.३३८ व निमखेडी शिवार गट नं.३४२ मधिल १८ मी. रुंद विकास योजना रस्ता व त्या रस्त्यास जोडणारा २४ मी.रुंद रस्ता डांबरीकरण करणे. | १,२५,००,०००/- |
| ३ | प्रभाग क्रं.०६ अंतर्गत टागोर नगर येथील रस्त्याचे डांबरीकरण करणे. | ९०,००,०००/- |
| ४ | प्रभाग क्रं.०५ अंतर्गत नविपेठ परिसरातील रस्ते कॉक्रिटीकरण करणे. | १,२१,००,०००/- |

महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांचा विकासासाठी विशेष तरतुद योजने अंतर्गत शासन निर्णय क्रं.मनपा-२०२५/प्र.क्रं.-१(भाग-९) नवि-१६(ई-९२००४९) मंत्रालय, मुंबई-३२ दि.२७ फेब्रवारी २०२५ अन्वये सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील तरतुद रक्कम रु.१,०३,५१,०००/- इतका निधी मंजुर करण्यात आलेला आहे. सदर निधी अंतर्गत उपरोक्त १ ते ४ कामांपैकी कोणते काम हाती घ्यावे याबाबत कार्यनिश्चिती होणेस तसेच सदर कामापोटी येणारा खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी शहर अभियंता,सार्व.बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार उपरोक्त १ ते ४ कामांपैकी अ.क्र.१ चे काम करणे कामी येणाऱ्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप व कायदेशीर अडचण येणार नाही याची दक्षता घ्यावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**